# ।। साध लछ को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ साध लछ को अंग लिखंते ।।

।। चौपाई ।।

**आ हे रीत आद अनादी ।। स्वारथ सबे पुकारे ।।**
**जन सुखराम मिल्याँ सब बंदे ।। तजीयाँ धेक बिचारे ।।१।।**

जगात कोणाला कोणाशी मायावी स्वार्थ असतो.तेंव्हा तो मनुष्य ज्याच्याशी स्वार्थ असतो त्याला वंदन करतो.म्हणजे प्रीती करतो आणि स्वार्थात जेंव्हा ठेच पोहचतांना दिसते. तेंव्हा ज्याच्याने ठेच पोहचतांना दिसते.त्याच्याशी तोच मनुष्य द्वेष करतांना दिसतो.ही रीत आधीपासून(आदि अनादी)पासून जगातील लोकांमध्ये चालत आहे. ।।१।।

**जब लग हेत धेक मिल दोनू ।। तब लग जक्त कहिये ।।**
**जन सुखराम साध लछ एसा ।। पीयाँ सब तिस छीजे ।।२।।**

जसा स्वभाव जगातील लोकांमध्ये चालत आला.तसाच स्वभाव जगातुन साधु बनल्यानंतर साधुमध्ये चालत आहे म्हणजे जेथे स्वार्थ आहे.तेथे प्रिती आहे आणि जेथे स्वार्थामध्ये नुकसान आहे.तेथे द्वेष आहे.तर तो साधु जगातील लोकांना भले ही साधु दिसो परंतु साहेबाच्या दृष्टीने तो साधु नाही.जगातील बरोबरीचा मनुष्य आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाला सांगतात की,साधु लक्षण जलासारखे असतात.ज्याला तहान लागली त्याची तहान जल(पाणी)पिताच तृप्त होते.तसेच ज्याला काळाच्या दुःखातून काढून महासुखाच्या देशात जाण्याची तहान लागली आहे.ती तहान जर साधुने मिटत नाही. तर तो साधु जगाच्या समजचा आहे.तो साधु साहेबाच्या समजचा नाही. ।।२।।

**ना काहु सूं बेर दोसती ।। आपे घराँ न जावे ।।**
**जन सुखराम जाय आराध्या ।। दुतिया भाव न लावे ।।३।।**

खऱ्या साधुला कोणाशी वैर राहत नाही.तर कोणाशी दोस्ती ही राहत नाही.यामुळे सगळ्या करीता दुतीय भावापासून मुक्त राहतात.ते कोणाच्या घरी स्वतः होवून कधी जात नाही. परंतु त्यांना आदराने कोणी आमंत्रित केले तर ते त्याच्या घरी नक्की जातात.तेंव्हा ते आमंत्रित करणारा श्रीमंत आहे किंवा गरीब आहे.उंच जातीचा आहे का हलक्या जातीचा आहे असे दोन भाव कधीही आणत नाही.त्यांना सर्व जीव परमात्म्याचे आहे.परमात्मा प्राप्त करण्याकरीता एकाचा अधिकाराचे आहे असे दिसते.माया कमी जास्त आहे म्हणून साहेब प्राप्त करण्याकरीता कमी जास्त अधिकार आहे,ही खोटी समज कधी मानत नाही. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अशी खोटी समज ज्याला येते तो साधु किंवा गुरु जगाच्या लोकांच्या स्वभावाचा आहे. म्हणजे जगाच्या बरोबरीचा आहे.साहेबाच्या स्वभावाचा पोहचचा नाही. ।।३।।

**जब लग बुरी भली सब भ्यासे ।। काम क्रोध अेंकारा ।।**

जन सुखराम ताहा लग भै हे ।। त्रुगटी तत्त बिचारा ।।४।।

जो पर्यंत संत जगातील हंसाना माया कमी जास्त तोलतो आणि त्या साधुला जगातील मनुष्य मायेच्या अनुसार चांगले वाईट दोन भाव ठेवतात आणि त्या साधुच्या घटात काम, क्रोध,लोभ,मत्सर,अहंकार ओतप्रोत भरलेला असतो.तोपर्यंत त्या साधुने त्रिगुटी तत्त म्हणजे सतस्वरुप ब्रम्ह प्राप्त केले नाही.हे जगातील जीवांनी ज्ञानाने विचार करावा आणि त्या साधुला स्वतःच्या आवागमनाचे भय आहे हे समजावे. ।।४।।

ऊपजे खरी जरे सो माही ।। से नर साध कहिजे ।।
जन सुखराम सुणत सम बोले ।। जक्त बराबर दीजे ।।५।।

साधुची कोणी निंदा केली तर त्या साधुला निंदकाच्या प्रती काही वेळे करीता नाराजी जरुर उपजते परंतु ती नाराजी सहजमध्ये क्षिण(मिटून)होवून जाते.तो साधु साहेबाच्या देशाचा साधु आहे.हे समजावे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो साधु त्याची निंदा ऐकताच अहंकाराच्याबरोबर क्रोधाने उबर(क्रोधित)होतो.तो साधु जगाच्या समजच्या बरोबरीचा आहे.त्याच्यात साहेबाचे गुण नाही,मायेचे गुण आहे,काळाचे गुण आहे हे ज्ञानाने समजावे. ।।५।।

सब सू हेत बेर नही बंधे ।। निरपख ज्ञान बिचारे ।।
जन सुखराम सूर के ऊदै ।। ठगे मुसे कुण मारे ।।६।।

ज्या साधुला कोणाशी प्रिती किंवा वैर उपजत नाही.तसेच जो सर्वामध्ये ओतप्रोत भरलेला आहे.अशा निरपक्ष सतस्वरुप ब्रम्हच्या ज्ञानात स्वतः लिव लावून असतो आणि जगाला ही लिव लावून ठेवतो.अशा साधुमध्ये काम,क्रोध,अहंकार हे ठग कधीही उबरत नाही.या साधुची स्थिती जसे सुर्य उगवल्यावर कोणी ठगाच्याने ठगविल्या जात नाही व मान मुरगाळणाऱ्याच्याने मुरगाळली जाणार नाही व कोणाच्याने मारल्या जात नाही.अशा प्रकारे सत्तज्ञान वैराग्य ने बनलेली राहते.।।६।।

निरपख साध पखे बंध लोई ।। धेक करे सो दाणो ।।
जन सुखराम मुख सूं मीठा ।। कपटी नरक बखाणो ।।७।।

खरे साधु निरपक्ष असतात.तसेच जे मायेचा पक्ष ठेवतात.ते साधु जगातील लोकांसारखे मायावी स्वार्थी असतात.विज्ञान वैरागी राहत नाही.जे साधु राक्षसांसारखे जगाला मायेने पाहून द्वेष करतात.ते राक्षसांच्या स्वभावाचे आहेत हे समजावे.जे साधु जगातील कपटी सारखे जगाशी गोड बोलतात आणि कपट ठेवून जगाशी धोका करतात.ते नर कपटी आहेत.असा पक्ष ठेवणारे द्वेषी,कपटी यांना साहेब मिळाला नाही.हे समजा. ।।७।।

हरजन हेत राम सूं लागा ।। दूजी सेझ सभाई ।।
जन सुखराम चाय बिन दुबध्या ।। काहाँ बिराजे आई ।।८।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

जे हरीजन आहे त्यांना फक्त आणि फक्त रामाशी प्रीती लागलेली असते आणि त्यांना मायावी वासनिक वस्तुशी काही लगाव राहत नाही.मायेत ते सहज जगतात.त्यांच्यात मायेची चाहना राहत नाही.म्हणून त्यांच्यात दुबध्या म्हणजे माया प्राप्त करण्याचे दुःख राहत नाही.त्यांना साहेब प्राप्त करण्याचा आनंद असतो. ।।८।।

**चरचा सकळ पखा की लावे ।। खांचे आप तणी रे ।।**
**जन सुखराम चाय को कोठो ।। अंतर चाय घणी रे ।।९।।**

जो साधु चर्चेत म्हणत ज्ञानात मायेचा पक्ष खेचून–खेचून म्हणजे ताणून–ताणून आणतो. तो साधु मायेच्या चाहनेचा कोठार आहे.म्हणजे भंडार आहे.असे समजा म्हणजे त्याच्या हंसाच्या हृदयात काळाच्या मुखात ठेवणारी मायेची चाहनाच चाहना भरली आहे असे समजावे.।।९।।

**जन की चाय दाय सब ऊठी ।। अंतर ध्यान चढावे ।।**
**जन सुखराम सूर के ऊगे ।। दुबध्या रात न आवे ।।१०।।**

खऱ्या साधुची मायावी चाहनेची आग(दाह,तप्त)सर्व उठून गेलेली असते.म्हणजे मिटून (नष्ट)गेलेली असते.त्याच्या हंसाच्या हृदयात फक्त साहेबाचेच ध्यान असते.जसे सुर्य उदय झाल्यावर रात्रीच्या अंधाऱ्याचे कष्ट राहत नाही.तसेच सतस्वरुप ज्ञान हंसाच्या हृदयात प्रगट झाल्याने वासनिक मायेच्या चाहनेचे दुःख राहत नाही. ।।१०।।

**घ्रित खांड गुळ नाज किराणो ।। ऊच निच कुल होई ।।**
**जन सुखराम हीर कण लेणा ।। जात भेद नहीं कोई ।।११।।**

ज्या संताची मायेच्या चाहनेची आग उठून गेली आहे आणि ज्याचे ध्यान गगणात (आकाशात)आहे.अशीच स्थिती बनविण्याची ज्याची चाहना आहे.त्याने तो संत निच कुळाचा आहे किंवा उंच कुळाचा आहे.हे न पाहता त्याच्याकडून साहेब प्राप्त करण्याचा भेद घ्यायला पाहिजे.जगाचा दाखला देवून आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगीतले की,तुप,साखर,गुळ,धान्य हा किराणा घेतांना उंच जातीच्या मनुष्याकडूनच घ्यायला पाहिजे.परंतु हिरा घ्यायचा आहे तर उंच निच जात न बघता जेथे मिळतो तेथे घ्यायला पाहिजे.कारण हिरा किराण्याच्या दुकाना सारखा गल्ली गल्लीत राहत नाही.त्या हिऱ्याचा कोणी एखादाच व्यापारी असतो.याचप्रकारे मायेच्या करण्या सांगणारे गल्ली गल्लीत राहतात.तेथे उंच ब्राम्हण आहे किंवा नाही हे पाहूनच करणी क्रिया धारण करायला पाहिजे.परंतु साहेब प्राप्त केलेले साधु गल्ली गल्लीत राहत नाही.विरळेच राहतात आणि ते निच जातीचे ही राहीले.तरी ही त्याच्यात निच माया राहत नाही.त्यांच्यात सर्व साहेबाचे ६४ चे ६४ अंग ओतप्रोत आलेले असतात. ।।११।।

**हीरो जाय बणे ताहां लीजे ।। क्हा जात सूं कामा ।।**

**जन सुखराम लेत उजियालो ।। धरे नख चख रामा ।।१२।।**

हिरा जेथे मिळाला त्याच्यापासून घ्या.त्याच्यात जाती–पातीचे काम ठेवू नका.तो हिरा घेताच घरात प्रकाश देईल.याचप्रकारे सतगुरु ज्या ही जातीचे आहे तो जातपात पाहू नका आणि त्या साधुपासून रामजीचा भेद घेवून घटात नखापासून डोळ्यापर्यंत प्रकाशमान करवून घ्या. ।।१२।।

**सौदे फरक फेर हे अेतो ।। काची पक्की रसोई ।।**
**जन सुखराम बिप्र ज्हाँ जिमे ।। बणत असल घर माई ।।१३।।**

दुसरा दाखला देत आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कच्चा पक्का स्वयंपाकाचा फरक जगात चौडा म्हणजे सर्वांना माहित आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहेत की,ब्राम्हण कच्चा स्वयंपाक म्हणजे दाळ,तांदूळ,चपाती,कढी, भाजी हे उंच घरातही चांगल्या ब्राम्हणाच्या हाताने तयार झालेला खातात. ।।१३।।

**लाडु पेड़ा सरस जलेबी ।। बिप्र जीम सब जावे ।।**
**जन सुखराम भेद भिन नाही ।। जे सतगुरू रूप कहावे ।।१४।।**

परंतु तेच ब्राम्हण लाडू,पेढा,रसदार जिलेबी असा पक्का स्वयंपाक सर्व जागी ग्रहण करतात.तेंव्हा ते उंच ब्राम्हणाच्या घरचा स्वयंपाक आहे किंवा निच घरातील स्वयंपाक आहे हा भेद भाव ठेवत नाही.याचप्रकारे साहेब प्रगट झालेल्या सतगुरुचे रुप आहे.।।१४।।

**हद मे गुरू परे सो सतगुरू ।। तंहाँ कारण नही कोई ।।**
**जन सुखराम धात तो सब ही ।। कनक काट नही होई ।।१५।।**

हद म्हणजे ज्याला काळ खातो.असे मायेच्या मुखात ठेवणारे गुरु आणि सतगुरु म्हणजे बेहद म्हणजे काळाच्या पलिकडे सतपदात पोहचविणारे गुरु असे काळाच्या पलिकडे सतमध्ये पोहचविणाऱ्या गुरुची जातपात पाहण्याचे कारणच नाही राहत.कारण ते सतगुरु माया राहत नाही.ते सतगुरु साहेब असतात.जसे जगात धातूचे अनेक प्रकार आहे.तसे मायेचे गुरु ही अनेक प्रकारचे आहेत.आणि जसे सोने सोड्न सर्व धातूंना गंज लागतो. तसे या गुरुंनाही काळ खातो.परंतु जसे सोने हा ही धातू आहे.त्याला कधी काट लागत नाही.याचप्रमाणे त्रिगुणी मायेच्या चाहनेने खरा काम,क्रोध,लोभ,मत्सरद्वारे काळाचा गंज लागत नाही. ।।१५।।

**दूजा गुरू नीर सम कहाये ।। धरम करम सब पाले ।।**
**जन सुखराम अगन ज्यूं सतगुरू ।। असुभ सुभ सब जाळे ।।१६।।**

मायावी गुरु मायावी धर्म व कर्म करवतात म्हणजे कर्मापासून मुक्त करीत नाही.हे गुरु जसे पाण्याने भांड्याचा तेलाने चिकटलेला कीट साफ होत नाही.अश्या पाण्यासारखा असतो.सतगुरु अग्नी सारखे असतात.जसे अग्नी भांड्याचा कीट जळून पूर्ण साफ

करतो.थोडाही कीट राहू देत नाही.तसेच हे सतगुरु जीवाचे सर्व(चांगले,वाईट)कर्म जाळून टाकतात.।।१६।।

**दूजा गुरू जक्त सूं मिलता ।। सब मिल ध्रम ऊचारे ।।**
**जन सुखराम सतगुरू असे ।। एको ब्रम्ह बिचारे ।।१७।।**

सतस्वरुपाचे गुरु सोडून अन्य मायेचे सर्व गुरु जेंव्हा जगाशी भेटतात.(मिळतात)तेंव्हा काळाच्या मुखात राहणारे त्रिगुणी मायेचे वेग वेगळे सर्व धर्म एकाच वेळी उच्चारतात. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जेंव्हा जगाला सतगुरु भेटतात.तेंव्हा जो काळाच्या पलिकडील सर्व जगाच्या एकमात्र ब्रम्ह आहे.जो काल ही होता,आज ही आहे, उद्याही राहील,जो काळाच्या पलिकडील महासुखाचा दाता आहे.त्याचे ज्ञान आणि विधी चालवतात.काळाच्या मुखात राहणारे एक ही ज्ञान चालवत नाही. ।।१७।।

**गुरू सो ज्ञान बिचारे सारा ।। निरख परख ले चाले ।।**
**जन सुखराम सतगुरू असा ।। भली बुरी सब पाले ।।१८।।**

त्रिगुणी मायेचे गुरु मायेच्या शुभ तसेच अशुभ विध्या मायेच्या ज्ञानाने निरखुन पारखुन म्हणजे तपासून तपासून धारण करतात.ज्या विधी मध्ये पुढे त्रिगुणी मायेपासून सुख आहे. त्या विध्यांनाच धारण करतात आणि ज्या विध्यांमध्ये पुढे दु:ख आहे त्यांचे सदा त्यागन करतात.परंतु सतस्वरुपी सतगुरु त्रिगुणी मायेची शुभ किंवा अशुभ अशी एकही विधी मानत नाही.त्यांना ह्या सर्व विध्या भले शुभ असो वा अशुभ असो ह्या काळाच्या मुखातीलच ग्रास(चारा)आहे.असे ज्ञानाने नित्य दिसते. ।।१८।।

**सब सूं मेल रहे सो दागा ।। देव दरस अवतारा ।।**
**जन सुखराम अगम मुख डाऱ्यां ।। नही रहे मेल लगारा ।।१९।।**

या मायावी गुरुपासून मायावी देव तसेच अवतारांचे दर्शन जरुर होते.परंतु या मायावी देवतांकडून जीवाचे मन,५ आत्मा तसेच कर्म कधी ही जळत नाही.जसे पाण्याने धुतल्याने भांड्याचा चिकटलेला तेलाचा मळ तसेच डाग तसेच्या तसेच राहतात.ते डाग पाण्याने कधी ही निघत नाही.परंतु अग्नीत ते भांडे टाकताच डाग लगेच गळून जातो. याचप्रमाणे सतगुरुच्या शरणात गेल्याने,सतस्वरुप परमात्म्याचे घटातच दर्शन होते आणि तो परमात्मा प्रगट होताच जीवाचे सर्व मन,५ आत्मा तसेच सर्व कर्माचा मळ तसेच डाग सदाकरीता जाळून देतो. ।।१९।।

**सतगुरू गुरू आँतरो जोजन ।। रात दिवस ज्यूं होई ।।**
**जन सुखराम हद के गुरू सूं ।। तन मध समज न कोई ।।२०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाला सांगतात की,सतगुरु आणि हदगुरु यांच्यात अमावस्येची अंधारी रात्र तसेच पूर्ण प्रकाशमय दिवस यांच्यात जसे अंतर आहे तसे

अनंत योजनचे अंतर आहे.हदगुरुंना तनाच्या बाहेरच्या क्रिया–करणीची समज असते. तनाच्या(शरीराच्या)आतील साहेबाची समज राहत नाही आणि सतगुरुला नखापासून डोळ्यापर्यंत तनात साहेब दिसतो. ।।२०।।

**सतगुरू सेन लखे सब न्यारी ।। खंड ब्रम्हंड सब सोझे ।।**
**जन सुखराम तन मध साहिब ।। निरख निसो दिन खोजे ।।२१।।**

सतगुरु स्वत:च्या तनाला खंड–ब्रम्हंड बनवतात आणि रात्र–दिवस साहेबाचे वेग–वेगळे चिन्ह तनात शोधतात. ।।२१।।

**सातूं गुरू बसत यूं न्यारा ।। सुणज्यो सकळ सेंसारा ।।**
**जन सुखराम भेद सब भाकूं ।। गुरू गुरू का न्यारा ।।२२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व संसारींना सांगतात की,जगात सात प्रकारचे गुरु नेहमी असतात.या साती वेग–वेगळ्या गुरुंचे भेद कसे आहे हे सांगत आहे.।।२२।।

**प्रथम गुरू सो पिता कहावे ।। लिंग बिज नाभ मे न्हाखे ।।**
**दूजी माय सत्त कर भाखे ।। नव मास ग्रभ मे राखे ।।२३।।**

प्रथम गुरु पिता आहे.त्यांच्याने जीवाला आईच्या गर्भात वास मिळतो.दुसरा गुरु माता (आई)आहे.जी ९ महिन्यापर्यंत जीवाला गर्भात ठेवते. ।।२३।।

**तिजा गुरू ग्रभ सूं झेले ।। दाई जतन करे भू मेले ।।**
**चोथा गुरू ब्राम्हण भाई ।। दिया नांव जक्त के माई ।।२४।।**

तिसरा गुरु दाई आहे.जी जीवाच्या देहाला गर्भातून काढते(झेलते)आणि धरतीवर ठेवते.चौथा गुरु ब्राम्हण भाऊ आहे.जो शरीराला जगात ओळखण्या करीता देहाला नाव देतो.।।२४।।

**खवास गुरू सब केस संवारे ।। मस्तक हाथ मुंड पर धारे ।।**
**कन फूंका षट गुरू कहावे ।। कर माळा अवतार जपावे ।।२५।।**

पाचवा गुरु न्हावी आहे.तो हंसाच्या देहाच्या शिरावर हात फिरवून फिरवून केस सुंदरतेने सवारतो.सहावा गुरु कानात मंत्राचे उच्चारण करुन फुंक मारतो आणि हातात अवतारांची माळ जपायला सांगतो. ।।२५।।

**सतगुरू ब्रम्ह मिलावे मांही ।। भव बंधन जुग भ्यासे नाही ।।**
**निरभे जाग जाहाँ गुरू मेले ।। काळ क्रम कुबुध सब पेले ।।२६।।**

सातवा गुरु घटात सतस्वरुप ब्रम्ह मिळवून देतो आणि भवसागराच्या बंधनात टाकणारे मन तसेच ५ आत्मा मिटवून देतो.ज्यामुळे भवबंधनाची भीती वाटत नाही.हे सतगुरु जेथे काळ नाही अशा भयरहीत सतस्वरुप ब्रम्हच्या जागी पोहचवून देतात.तसेच काळाच्या मुखात ठेवणारे काळ कर्म तसेच काळ कुबुध्दी सर्व मिटवून देतात. ।।२६।।

**रमता को गुरू भेद बतावे ।। ता संग होय गिगन घर आवे ।।**
**कूंची ज्ञान गम सब देवे ।। जडीया ताक खोल सब लेवे ।।२७।।**

हे सतगुरु जो सर्व घटात रमून राहीला आहे.अशा रमता रामाचा घटातच भेद सांगतात आणि हंसाला रमता रामासोबत गगणघरातच पोहचून देतात.हे सतगुरु गगन मंडळात पोहचविण्या करीता शिष्याला ज्ञानाच्या भेदाच्या सर्व कुंच्या(किल्या)देतात.ज्याच्याने शिष्य गगन मंडळाकडे येणारे स्थाना स्थानाचे सर्व दरवाजे उघडून देतात. ।।२७।।

**सतगुरू मिल्या भ्रम सब भागे ।। अणभे ज्ञान आतमा जागे ।।**
**नेःचळ होय चळे जन नाही ।। सो करता नर पावे माही ।।२८।।**

असे सतगुरु मिळाल्यावर त्रिगुणी मायेचे सर्व भ्रम,वेद,शास्त्र,पुराण इत्यादी पळून जातात आणि भयरहीत देशाचे विज्ञान ज्ञान आत्म्यामध्ये म्हणजे हंसाच्या हृदयात जागृत होते.मायेचे सर्व भ्रम मिटल्याने आणि हंसात सतविज्ञान प्रगट झाल्याने हंस निश्चल होवून जातो.जराही मायेमध्ये चलायमान होत नाही.ज्याच्याने हंसाच्या घटात सतस्वरुप कर्ता प्राप्त होतो. ।।२८।।

**कानाँ सुणे दिष्ट सूं देखे ।। सो सब बात तन मे पेखे ।।**
**तीरथ बरत धाम सब देवा ।। घर अस्थान तन मे सेवा ।।२९।।**

गुरुंच्या ज्या ज्या गोष्टी कानाने ऐकल्या तसेच दृष्टीने(डोळ्यांनी)पाहिल्या त्या सर्व गोष्टी म्हणजे तिर्थ,व्रत,धाम,देवता,अवतार त्यांच्या घरी,त्यांचे स्थान,त्यांची सेवेची पोहच शिष्याला त्याच्या घटातच सांगतात. ।।२९।।

**सतगुरू मिल्या ईसी बिध पावे ।। ओ तन खोज अगम घर जावे ।।**
**जन सुखराम ओर गुरू सारा ।फळ दायक सब काय बिचारा ।।३०।।**

सतगुरु मिळाल्यावर हंस तनात देवी-देवतांचे तसेच अवतारांचे सर्व स्थान शोधून महासुखाच्या अगम घरी जातात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मायेचे अन्य गुरु जे मायेच्या करण्या करवितात.त्याचे काळाच्या मुखातील मायावी सर्व फळ प्राप्त करुन देतात.परंतु काळाच्या पलिकडील अगम घर प्राप्त करुन देत नाहीत. ।।३०।।

**सतगुरू सरण मोख घर पावे ।। आवागवण रोग सब जावे ।।**
**गुरू सतगुरू अंतर बोहो भाई । ते समज्या ज्याहाँ धिन कमाई ।।३१।।**

सतगुरुंच्या शरणात आवागमनाचा रोग मिटतो आणि महासुखाचा परममोक्ष प्राप्त होतो. असे काळाच्या मुखात ठेवणे आणि काळाच्या मुखातुन काढून महासुखात पोहचवितात असे भारी अंतर मायेचे गुरु आणि सतस्वरुपाचे गुरुत आहे.हे अंतर ज्याला समजले आणि हे अंतर समजून ज्याने सतगुरुची विधी धारण केली त्याची कमाई धन्य झाली. ।।३१।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

गुरू तो सकळ ज्हान के होई ।। सतगुरू सरण दुलभ सिष जोई ।।
दूजा गुरू जनम जुग लारे ।। लख चोरासी नाही निवारे ।।३२।।

त्रिगुणी मायेचे गुरु तर सर्व जगातील मनुष्यांना होत आले आहे.परंतु सतगुरुंचा शरणा मिळालेला मनुष्य म्हणजे शिष्य दुर्लभ आहे.अशा दुसऱ्या गुरुंचा शरणा आदिपासून जेंव्हा पासून होनकाळ पारब्रम्ह सोडला तेंव्हा पासुन प्रत्येक मनुष्याला मनुष्य योनीत एकपेक्षा जास्त वेळा मिळाला आहे.परंतु या कोणत्या ही गुरुने चौऱ्याशी लाख योनीचा फेरा आजपर्यंत सुटला नाही. ।।३२।।

जन सुखराम सत्त गुरू मेळा ।। नर देह पाय मिले पद भेळा ।।
आवागवण ब्होर नही आवे । पण भाग बिना सतगुरू नही पावे ।।३३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असा हा लक्ष चौऱ्यांशीचा फेरा मनुष्याला सतगुरु मिळाल्या वरच सुटतो.असे सतगुरु मनुष्य देह मिळाल्यावर जीवाला मिळाले. तर ८४ लाख योनीच्या आवागमनात कधीही येत नाही.तसेच महासुखाच्या पदात सदा करीता जातो.परंतु सतगुरु भाग्या शिवाय मिळत नाही. ।।३३।।

बिना भाग कोई नही पावे ।। सतगुरू हर दिदारा ।।
जन सुखराम सुखी नर थोडा ।। दु:खि घणा शिर मारा ।।३४।।

अशा परमसुखाच्या पदात पोहचविणारे सतगुरु–हरजीच्या शरणा भाग्या शिवाय कोणी प्राप्त करीत नाही.असा शरणा प्राप्त करुन महासुखांना प्राप्त करणारे मनुष्य थोडेच राहतात आणि काळाच्या मुखात राहून अनंत महादु:खाचा मार जीवाच्या शिरावर ठेवून सहन करणारे अनंत असतात. ।।३४।।

गुरू सूं मिल्याँ चानणो एतो ।। दीपक बाट जगाई ।।
जन सुखराम सतगुरू मिलीयाँ ।। सूर ऊदे जुग माई ।।३५।।

घोर अंधाऱ्या रात्री दिव्याची बत्ती लावल्याने जितका प्रकाश होतो तितका प्रकाश त्रिगुणी मायेच्या गुरुपासून जीवाला होतो.म्हणजे जीवाला त्रिगुणी मायेपासून अल्प सुख मिळते.परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की जगात सुर्य उगवल्यावर अंधारी रात्र जशी नष्ट होवून जाते.तसे जीवाला सतगुरु मिळाल्यावर काळाचे महादु:ख मिटून जाते आणि आनंदपदाचे महासुख मिळते. ।।३५।।

कनिष्ट गुरू ओस को पाणी ।। कहे पण प्यास न जावे ।।
जन सुखराम सतगुरू सायर ।। मिलता प्यास बुझावे ।।३६।।

दवाच्या पाण्याला ही गोड पाण्याच्या समुद्राच्या पाण्यासारखे पाणी म्हणतात.परंतु अशा पाण्याने कोणी तहानलेला मनुष्य तहान मिटवू म्हणतो.तर त्या पाण्याने त्या तहानलेल्याची तहान जराही मिटत नाही.त्याच्या जागी गोड पाण्याच्या समुद्राचे पाणी पिताच तहान

मिटून जाते.याचप्रमाणे कनिष्ठ गुरु म्हणजे त्रिगुणी मायेचे गुरुकडून काळाचे दु:ख जराही मिटत नाही.परंतु सतगुरु मिळताच युगानुयुगापासून जखडलेले आवागमनाचे दु:ख सहज मध्ये मिटून जाते. ।।३६।।

**देवळ देव देवरा बंधिया ।। तीरथ जक्त चलीरे ।।**
**जन सुखराम कहे सब सुणज्यो ।। पूजा सबी भली रे ।।३७।।**

धरतीवर अनेक मंदीर बनले आहे.त्याच्यात ब्रम्हा,विष्णू,महादेव इत्यादींच्या मुर्तिची स्थापना केली आहे.६८ प्रकारचे तिर्थ बनविले आहेत.यांच्या पुजेत सर्व जग लागले आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्वांना सांगतात की ह्या सर्व पुजा चांगल्याच आहेत. ।।३७।।

**पूजा राम किस्न वां कीनी ।। से अवतार कहाया ।।**
**जन सुखराम वशिष्ट गुरू रे ।। दुर्वासा पूजाया ।।३८।।**

परंतु रामचंद्र आणि कृष्ण ज्यांना सर्व जग विष्णूचा अवतार समजतात.त्यांनी जगातील लोकांसारखे मंदिरात जावून ब्रम्हा,विष्णू,महादेव तसेच शक्तीची पुजा केली नाही.तसेच ६८ तिर्थातील कोणत्या तिर्थाला गेले नाही.त्यांनी म्हणजे रामचंद्राने वशिष्ठ गुरु आणि कृष्णाने दुर्वासा गुरुची पुजा केली याचे कारण काय? ।।३८।।

**पांडु पांच युधिष्टिर राजा ।। पूजा अखंड चलाई ।।**
**जन सुखराम कहे सब सुणज्यो ।। पूजा टेल गुण भाई ।।३९।।**

युधिष्ठीर राजासहीत पाची पांड्वांनी गुरुची अखंडीत पुजा चालविली.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्वांना सांगतात की,गुरुची पुजा तसेच सेवा करणे हे बरोबर आहे. ।।३९।।

**पूजा पाँण टेल सब सांई ।। भाव बाढ सो दिया ।।**
**लव समसेर साच कर पकड़ी ।। क्रम कतल सब किया ।।४०।।**

दगडाची पुजा आणि सेवा हे भाव वाढण्याकरीता आहे.(जसे तलवार दगडावर घासल्याने तिला धार येते तसेच दगडाच्या मुर्तिला पुजल्याने त्या देवाला भाव येतो.)तसेच तलवारला धार आली म्हणजे त्याच्याने कर्माची कत्तल करु शकतात(असेच गुरुशी भाव आला तर दगडावर घासलेली तलवार सारखा भाव आला तर दगडावर घासलेली तलवार सारखा भाव भक्तीला वाढ(धार)येवून जाते.गुरुशी भाव आल्याने कर्मांची कत्तल होवून जाते)लव लावणे ही तलवार आहे.(त्या लवला)विश्वासाने पकडले तर सर्व कर्माची कत्तल होवून जाते. ।।४०।।

**हाथ पाँव मुख नेण नासका ।। श्रवण संग कमावे ।।**
**जन सुखराम ऊपजे ता संग ।। ऊलटा फेर गमावे ।।४१।।**

के कर्म हात,पाय,डोळे,नाक तसेच श्रवणासोबत कमवले जातात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्यांच्या सोबत हे कर्म उपजले त्याच्या सहाय्याने ते गमवता येतात. ।।४१।।

**चरण पाँव साधाँ दिस धारे ।। कर सू टेल करिजे ।।**
**जन सुखराम ज्ञान सुण सर्वण ।। पूजा शीश धरीजे ।।४२।।**

चरण पायाने कमावलेले होनकाळाचे निच–उच कर्म सतस्वरुपाच्या साधुच्या दर्शनास जाण्याने मिटून जातात.हाताने होणकाळाचे निच उंच केलेले कर्म सतस्वरुपी साधुची हाताने सेवा केल्याने मिटून जातात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात श्रवण हे ऐकून ऐकून होनकाळाचे बनलेले कर्म कर्णाने सतस्वरुपाचे ज्ञान ऐकल्याने मिटून जातात.।।४२।।

**नेणा निरख साध की सूरत ।। रसणा राम रटावे ।।**
**जन सुखराम अेई मिल कीया ।। अेई करम कटावे ।।४३।।**

डोळ्यांनी होनकाळाचे केलेले कर्म सतस्वरुपी साधुची सुरत न्याहाळल्याने मिटून जातात.जीभेने बोलून केलेले कर्म जीभेने राम स्मरण केल्याने मिटून जातात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,आवागमनात टाकणारे सर्व होणकाळाचे उंच –निच कर्म या सर्वांनी मिळून केले आहे.जसे या सर्वांनी होणकाळाचे मिळून कर्म केले.त्याचप्रकारे हे सर्व मिळून सतसाहेब साधुच्या सत्तेने कर्म कटतात. ।।४३।।

**अेसी सुंज मिले सब सारी ।। सो नर भक्त कमावे ।।**
**के सुखराम हात कर ऊपर ।। रसणा रोम धियावे ।।४४।।**

अशी कर्म काटण्याची पूर्ण समज ज्याला येते तोच मनुष्य साईची भक्ती कमवतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे मनुष्य हात वर करुन रसनेने राम रटण करतात.।।४४।।

कवत ।।

**सील साच संतोष ।। भाव परभाव पिछाणो ।।**
**प्रेम प्रित चित लीन ।। ज्ञान आतर मन जाणो ।। ४५ ।।**

१.शील म्हणजे ब्रम्हचर्य वा पुरुष–पत्नी व्रत,स्त्री–पतीव्रत २.सांच विश्वास चांगले झाले तर साहेबाने केले आणि वाईट झाले तर तर मी कारणीभूत आहे.३.संतोष–साहेबाने दिले आहे त्याच्यात खुश राहणे.कमी आहे हे न जाणवू देणे आणि कमी आहे म्हणून त्रिगुणी मायेशी भाव न ठेवणे.४.सतगुरुच परमात्मा आहे हा भाव ठेवणे.५.परभाव–सर्व जागेतील हंस परमात्म्याचे हंस आहे हे समजून त्या सर्वांशी प्रीती करणे.६.प्रेम–सतगुरुंना परमात्मा समजून सतगुरुंशी प्रेम करणे.७ प्रीत–सतगुरुंशी प्रीत करणे.८ चित्तलीन–विज्ञान वैराग्यात

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

चित्तलीन राहणे.त्रिगुणी मायावी वासनेत चित्तहीन राहणे.९.ज्ञान–सतस्वरुपाच्या ज्ञानाने चालणे.१०.मन आतुर साहेब प्राप्ती करीता निजमन आतुर करणे. ।।४५।।

**समता समज बिचार ।। हेत सब कूं सुख दाई ।।**
**नेम गरिबी नांव ।। लगन सिवरण सू भाई ।। ४६ ।।**

११.समता–माझा हंस आणि जगातील सर्व प्राणीमात्राचे हंसासारखे समजणे.मायेला पाहून कमी–जास्त न समजणे.१२.समज–सर्व सुखांचा कर्ता साहेब आणि सर्व दुःखाचा कर्ता मी म्हणजे माझे मन ही समज ठेवणे.१३.विचार–सतस्वरुपाचे विचार ठेवणे. वासनिक त्रिगुणी मायेचे विचार न ठेवणे.१४ हेत–सर्व जीवमात्रांशी प्रेम ठेवणे.१५. सर्वांना सुख देणे–मुंगी पासून हत्तीपर्यंत आपल्या बरोबर समजणे आणि सर्वांना सुख देणे. १६.नियम–गर्भात साहेबाशी करार केला त्या नियमाने राहणे.१७.गरीबी हंसाचे स्वतःचे अस्तित्व न राहणे.जे आहे ते परमात्माच दिसणे.१८.नाम–सतस्वरुप निजनामाशी लीव ठेवणे.त्रिगुणी मायेच्या नामाला त्यागणे.१९. स्मरण–सतनामाचे स्मरण करण्याची तलब ठेवणे. ।।४६।।

**बिरहे बसे बेराग ।। त्याग सूरा तन आवे ।।**
**ऐ अंग मिल चोविस ।। संत सुखराम कुवावे ।।४७।।**

२०.विरह–परमात्मापासून अनंत युगापासून दूर होण्याचे दुःख होणे आणि भेटण्या करीता आतुर राहणे. २१.वैराग्य–विज्ञान वैराग्य राहणे.२२. त्याग–त्रिगुणीमाया,५ विषयांच्या चाहनेचा त्याग करणे.२३.शुरविरता–म्हणजे सतस्वरुप परमात्मा प्राप्त करण्याकरीता शौर्याने होणकाळाशी लढण्याचे बळ ठेवणे.असे हे २४ स्वभाव मिळून एका जागी झाले म्हणजे तो हंस संत आहे हे समजावे. ।।४७।।

**धीरज धरम ध्यान ।। भेद भगवंत घट होई ।।**
**दया दान दिल पाक ।। नेम परमारथ सोई ।।४८।।**

१.धीरज–त्रिगुणी मायेचे मोठे चरीत्र पाहून साहेबाच्या प्रती भाव कमी न करणे.२.धर्म– जो कालही होता,आजही आहे आणि उद्याही राहील असा त्रिकाल सत्य आहे तसेच ज्याच्या आधाराने होणकाळ,त्रिगुणी माया तसेच जीव सुख भोग भोगत आहे.त्याचा शरणा ठेवणे हा धर्म.३.ध्यान–सदा त्रिकाल सत्य परमात्म्याचे ध्यान करणे.४.भेद– भगवंताला घटात प्रगट करण्याचा भेद असणे.५.दया–जसे आवागमनातून निघण्या करीता कोणी हंसाने माझ्या हंसावर दया केली.त्या कारणाने मी आवागमनातून मुक्त झालो ती दया अन्य मनुष्य जीवांच्या प्रति ठेवणे.६.दान–परमात्म्याचे स्मरण करुन राहीला किंवा परमात्म्याच्या स्वभावाने जगत आहे असा जीव काही कारणाने खाण्या– पिण्यापासून गृहस्थी जीवनाचे अन्य गरजेची वस्तु नसल्या कारणाने दुःखी आहे.अशा

हंसाला गरज पुरत्या वस्तु पुरवणे.तसेच किड्यापासून(मुंगीपासून)हत्ती यांना अन्न तसेच राहण्या करीता जागा,थंडीत दान करणे.७.मन पवित्र ठेवणे.दिलपाम म्हणजे निजमन पवित्र ठेवणे,विकारी न ठेवणे.८.नियम ठेवणे–सतगुरुंनी धिन धिनताच्या अंगामध्ये तसेच मदभागी धिग्र धिग्रताच्या अंगात जे नियम सांगीतले तसे जीव जगणे. ।।४८।।

सितळ सेज सुभाव ।। बात मीठी मुख बाणी ।।
कोमलता ब्हो लीन ।। भेद सब लियो पिछाणी ।।४९।।

९.सितल–शांत राहणे.१०.सहज स्वभाव–साहेब जसा ठेवेल तसे राहणे.११.मुखाने मधुर वाणी बोलणे.१२.कोमलता–जीवांच्या प्रति कोमल राहणे.१३अतिलिनता–सतगुरुशी तसेच सतस्वरुपी संतांशी अतिलिन राहणे.१४.सर्व भेद ओळखून घेणे.म्हणजे जीव काय,मन काय,५ आत्मा काय,त्रिगुणी माया काय,होणकाळ काय,सतस्वरुप साहेब काय?हे सर्व भेद ओळखणे. ।।४९।।

पत पुरण प्रतीत ।। मत्त मन कू बस किया ।।
अे अंग मिल सुखराम ।। साध कू साहिब दिया ।।५०।।

१५. सतगुरुंची आणि रामजीची पूर्ण पत राखणे.१६.प्रतिती ठेवणे म्हणजे गुरु आणि रामजी वर पूर्ण विश्वास ठेवणे.१७.मनाच्या मताला वश करणे–हे असे स्वभाव साधुला साहेब बक्षिस करतात. ।।५०।।

जरणा जप सधीर ।। सरम साहिब दिस साची ।।
सतगुरु मेर म्रजाद ।। ज्ञान बिन करे न काची ।।५१।।

२०.जरणा २१.जप–साहेबाच्या नावाचा जप करणे.२२.सधीर २३.शरम–जप झाला नाही, गुरुकार्य झाले नाही याची शरण(लाज ठेवणे.)२४.साहेबाचा विश्वास ठेवणे.२५.सतगुरुंची मेर(बांधलेली मर्यादा)ठेवणे.२६.सतगुरुंनी साहेबाने दिलेल्या ज्ञानाशिवाय मनाने काही ही न करणे. ।।५१।।

अत आतर मन साच ।। चित चेतन सुध होई ।।
मन पवना संग साझ ।। दाग दुबध्या नही कोई ।।५२।।

२७.अती आतुर २८.निजमनात विश्वास २९.चित्ताला निर्मळ ठेवणे–त्याच्यात त्रिगुणी मायेची वासना येवू न देणे.३०.चेतनला निर्मळ ठेवणे.३१ मन आणि श्वास यांना संग करुन सतशब्दाची साधना करणे. ३२.डाग दुबध्या–साहेबाच्या प्रती सुख देणारे सत्य वा असत्य असे दोन विचार न ठेवणे.।।५२।।

सत बाचा गुरू धरम मे ।। अे चोसट अंग जोय ।।
गिगन बास सुखरामजी ।। सो जन साहिब होय ।।५३।।

गुरु धर्म ठेवणे आणि सत्य वचन बोलणे हे असे चौसष्ट स्वभाव ज्याच्यात दिसतात आणि त्यांचा शब्द गगनामध्ये निवास करुन राहीला आहे ते संत साहेबच आहेत. ।।५३।।

**आठ अंग चोसट लछ लियां ।। सो नर राम केहे ।।**

**जन सुखराम धिन नर जुग मे ।। गिगन मंडळ घर कर हे ।।५४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,खाली सांगीतल्यानुसार आठ स्वभाव आणि आठ स्वभावाचे चौसष्ठ लक्षण घेऊन जो मनुष्य राम राम म्हणेल आणि कंठस्थान सोडून गगन मंडळ म्हणजे दहाव्याद्वारी घर करेल तो मनुष्य धन्य आहे. ।।५४।।

**सीळ साच संतोष भाव सो ।। प्रेम प्रित चित लीन ।।**

**जन सुखराम दया घट जरणा ।। आठ अंग अे चिन ।।५५।।**

१.शील(ब्रम्हचर्याने राहणे)२.साच(विश्वास)३.संतोष ४.भाव ५.प्रेमप्रीत ६.चित्तलीन ७.दया ठेवणे.८.जरना ठेवणे म्हणजे सहन करणे हे असे आठ प्रकारचे(तऱ्हेचे)स्वभाव, ते ओळखून घ्या. ।।५५।।

दोहा ।।

**अंग अंग के आसरे ।। आठ आठ लछ जाण ।।**

**सुखराम दास न्यारा करो ।। सब लछ अंग पिछाण ।।५६।।**

या एक एक स्वभावाचे आठ आठ लक्षण उपजले आहे.ते समजा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज या आठ स्वभावाचे वेग वेगळे आठ आठ लक्षण म्हणजे सर्व मिळून ६४ लक्षण त्यांचे स्वभाव समजा असे सर्व संताना सांगत आहे. ।।५६।।

**बेण नेण सीतळ दसा ।। हास मगन नही नेहे ।।**

**सुखराम काम व्यापे नही ।। सील अंग लछ अेहे ।।५७।।**

शिल म्हणजे ब्रम्हचर्याचे खालील आठ लक्षण

१.बेण – काम रहीत वैरागी बोलणे. २.नयन – काम प्रकृती न ठेवता वैरागी प्रकृती ठेवणे. ३.शितल – घटात काम प्रकृतीला शितल ठेवणे. ४.दशा– घट आणि मनाची दशा.कामहिन म्हणजे शांत ठेवणे आणि विज्ञान वैराग्याशी तेज ठेवणे. ५.न हास्य – काम जागृत होईल असे हास्य न करणे. ६.मग्न– विज्ञान वैराग्यात मग्न राहणे.७.स्नेह – कोणाशी काम प्रकृतीने स्नेह न करणे.८.काम व्यापत नाही– अन्य कोणते ही चरित्र ज्याच्याने काम व्यापेल हे न करणे.या प्रकारचे आठ लक्षण शिलचे आहेत. ।।५७।।

**ज्ञान ध्यान गुण नेम ।। अरथ आदर निर्मोही ।।**

**भे अंतर सुखराम के ।। साच अेसा लछ होई ।।५८।।**

विश्वासाचे आठ लक्षण आहेत.

१.ज्ञान – विज्ञान ज्ञानात भिनलेले राहणे.(मग्न)२.ध्यान – विज्ञान ध्यानात भिनलेले राहणे.३.गुण – संतांच्या द्वारे सतस्वरुपाचे गुण प्रगट करणे आणि त्रिगुणी माया तसेच मन ५ आत्माचे सर्व काळाच्या मुखात टाकणारे गुण नाश करणे.४.नेम–आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी वाणीजीत सांगितलेले सर्व नियम पाळणे.५.अर्थ ६.आदर – सतगुरु आणि सतस्वरुपी संतांचा आदर करणे.७.निर्मोही – पत्नी,पुत्र,धन,राज्य इत्यादी वस्तुंपासून मोह काढून घेणे.८.भय – सतगुरु आणि परमात्म्याचा भय नेहमी ठेवणे. ।।५८।।

**धिरज धरम निरपख हे ।। ने: चळ ध्यान सधीर ।।**
**अे लछ हे संतोष का ।। सुखदेव चळे न बीर ।।५९।।**

संतोषचे आठ लक्षण –

१.धीरज २.धर्म ३.निरपक्ष ४.निश्चल ५.ध्यान ६.सधीर ७.चलायमान–कोणत्याही लोभाने चलायमान न होणे. हे संतोषचे आठ लक्षण आहे. ।।५९।।

**सुरत निरत मे रख रे ।। अत आतर चित चाय ।।**
**भाव लछ सुखराम के ।। सब सूं शीस निवांय ।।६०।।**

भाव ठेवण्याचे आठ लक्षण –

१.सुरत २.निरत–(न्याहाळणे) ३.मनात ठेवणे. ४.अती आतुर ५.चित्त ठेवणे. ६.चाहना ठेवणे. ७. सर्वांशी मस्तक नमवेल असे भावचे आठ लक्षण आहे. ।।६०।।

**प्रसण प्रगळ लीनता ।। चाह गरज बिज्ञान ।।**
**प्रेम लछ सुखरामजी ।। आदर सब को मान ।।६१।।**

प्रेमाचे ही आठ लक्षण आहेत.

१.प्रसन्न राहणे २.नरम होवून राहणे ३. लीन(नम्र)बनून राहणे ४. चाहा ठेवणे ५. गरज करणे ६. विज्ञान ७. आदर ८. मान राखणे हे प्रेमाचे आठ लक्षण आहेत. ।।६१।।

**सुध बुध सांसो बीसरे ।। सोग मन डर त्रास ।।**
**प्रित लछ सुखरामजी ।। लगी एक सू आस ।।६२।।**

प्रीतीचे आठ लक्षण असे –

१.शुध्द न राहणे २. बुध्दी न राहणे ३. संशय न राहणे ४. विसरुन जाणे ५. सोग न राहणे ६. मनात भय न राहणे. ७. मनात त्रास न राहणे ८. एकाची आशा लागलेली राहणे. ।।६२।।

**तलब तत ताकीद बोहो ।। अण बेदो न सुवाय ।।**
**बित्त लछ सुखरामजी ।। आठ पोहर हर गाय ।।६३।।**

चित्ताचे आठ लक्षण –

१.तलब लागलेली राहणे.२.तत्त ३.ताकिद (खुप घाई लागलेली असते) ४.अणबेदो गलबला न होणे.५. न आवड्णे दुसरे काही ही चांगले न वाटणे. ६. अष्टोप्रहर हरचे गायन करणे. ।।६३।।

**दान मान क्रणा करे ।। कष्ट सुध प्रतीत ।।**
**दया लछ सुखराम के ।। हार चले नही जीत ।।६४।।**

दयेचे आठ लक्षण –

१.दान देणे.२.मान – परमात्म्याच्या जीवाचा मान ठेवणे.हा समजतो की प्रत्येक जीव परमात्म्याचा आहे.माया कमी जास्त आहे.म्हणून मान कमी जास्त न ठेवणे.३.करुणा ४.कष्ट – ज्याला दया असते त्याला दुसऱ्याचे कष्ट बघून स्वत:च कष्ट घेतो.५.प्रतीत ६.शुध्द – प्रत्येक प्राणा करीता शुध्द राहतो मायेच्या स्वार्थाने राहत नाही.७.हार – स्वत:ची हार झाली म्हणजे दुसऱ्याची जीत झाली.त्याच्या विजयाचे गुण गातो अशी दया राहते.८.जीत – स्वत:ची जीत झाली म्हणजे दुसऱ्याची हार झाली तरी ही हार होणाऱ्या व्यक्तीच्या प्रति दया असते दयावानाचे हे विचार बनतात. ।।६४।।

**सुसतो सितळ बुध भे ।। चाय लेण बूहार ।।**
**जरणा लछ सुखराम जी ।। खिवण निवण मन मार ।।६५।।**

जरणाचे आठ लक्षण –

१.सुस्त – साहेब प्राप्त केल्याने माया प्राप्त करण्या करीता कोणी उचकवले तरी ही तो माया प्राप्त करण्याकरीता उचकत नाही.साहेब प्राप्त केल्याने याला कोणी किती ही चांगले वाईट केले तरी तो प्रतिक्रिया(प्रतिकार)रिॲक्ट करीत नाही.विचार करतो की जो निंदा करीत आहे तो भोळा आहे.समज नाही–नासमज आहे.२.शीत ३.बुध्दभय –साहेब नाराज न व्हावे हे भय त्याच्या बुध्दीत बनलेले असते.४.चाहणा ५.व्यवहार ६.खिंवण ७.निमन ८.मनाला मारणे.।।६५।।

**आठ अंग ये साध मे ।। चोसट लछ समेत ।।**
**सुखराम साध की पारखा ।। सबद चाल सहेत ।।६६।।**

साधुमध्ये सतशब्दाच्या सोबत आठ प्रकारचे ६४ लक्षण प्रगट आहे तरच तो साधु आहे ही परीक्षा करा. ।।६६।।

**अे अंग लछण ऊर ऊपजे ।। मोय मिलन के काज ।।**
**सुखराम प्रख चौडे धरी ।। सो जन जुग म्हाराज ।।६७।।**

हे स्वभाव लक्षण ज्या घटात मला मिळण्याकरीता उत्पन्न होतील तर सतगुरु सुखरामजी महाराजांनी ही साधुची परीक्षा मोकळी(उघड)केली की हे सतशब्दा सोबत स्वभाव आणि लक्षण ज्या साधु मध्ये आहे. तेच साधु जगात महाराज आहे. ।।६७।।

**आठ अंग लछ साध के ।। चोसट सुबद सहेत ।।**
**सो साचा सुखराम के ।। निर्मळ साधू हेत ।।६८।।**

आठ स्वभाव आणि ६४ लक्षणा सोबत सतशब्द ज्या साधुच्या घटात आहे तेच खरे साधु आहेत. तसेच तेच निर्मळ साधु आहेत. ।।६८।।

**अे लछण हर मिलन का ।। अष्ट अंग लव लीन ।।**
**पाया तो सुखराम के ।। वे लछ न्यारा चिन ।।६९।।**

जगात आठ स्वभाव आणि ६४ लक्षणात लवलीन आहे असे अनेक साधु आहेत परंतु आठही स्वभाव आणि त्यांच्या ६४ लक्षणात लवलीन राहून सतशब्द प्राप्त करतात ते लक्षण म्हणजे आठी स्वभावाच्या सोबत सतशब्द प्राप्त करणे हे जगाचे आठी स्वभाव आणि त्यांचे ६४ लक्षणात लवलीन आहेत त्याच्यापेक्षा खुप वेगळे आहे.हे सर्व ज्ञानी ध्यानी स्त्री–पुरुष समजा. ।।६९।।

**पाया प्रचा बेण क्हे ।। मुख बरसे चख तेज ।।**
**सदा सुख सुखराम के ।। अणभे कागद भेज ।।७०।।**

असे साधु साहेब प्राप्त करण्याचे पर्चे जगात बोलतात.तसेच त्यांच्या मुखात आणि डोळ्यात सतस्वरुपाचे तेज झळकतो.त्या साधुला साहेब प्राप्त करण्याचे सुख नेहमी राहते.।।७०।।

**मगन भया मन माय ही ।। अंतर ध्यान चढाय ।।**
**अब पाया सुखराम के ।। गिगन मंडळ घर जाय ।।७१।।**

अशा साधुचे निजमन परमात्म्यात सदा मग्न असते.साधु आत म्हणजे देहातच ध्यान चढवून गगन मंडळाच्या घरात पोहचतो आणि साहेबाला पूर्ण घटात प्राप्त करतो. ।।७१।।

**पाया की पारख सुणो ।। सबद बाज सेनाण ।।**
**ऊँ देऊं सुखराम के ।। भारी बोल पीछाण ।।७२।।**

साहेब पूर्ण घटात प्राप्त झाला याची ही परीक्षा आहे की,त्याच्या पूर्ण घटात सतशब्दाच्या ध्वनीचा आवाज गरजतो.तसेच आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,प्राप्त केलेल्याच्या देहातून अनमोल असे अगम देशाचे भारी बोल निघतात. ।।७२।।

**आट पोहर रहे अेकसा ।। बदन पलटे नाय ।।**
**रूप चडे सुखरामजी ।। दिन दिन दुणा मांय ।।७३।।**

अशा संताचा देह आठो प्रहर म्हणजे २४ ही तास एक सारखा साहेब प्राप्त केले या स्वभावाचा राहतो.त्याच्या देहात जराही होणकाळी स्वभावाचा बदल व्यापत नाही.उलट दिवसें दिवस त्याचे रुप जास्तच तेजवान बनते. ।।७३।।

दिष्ट तेज मुख भळ हळे ।। बायक वचन सतोल ।।
पूंता लछ सुखरामजी ।। भ्रम ताक दे खोल ।।७४।।

त्याची दृष्टी खुप तेजवान होवून जाते आणि त्यांच्या मुखाचे तेज झळकू लागते.त्यांचे वाक्य वचन,तोलून मापून खुप न्यायिक असतात.पोहचलेल्या साधुचे हे लक्षण ही आहे की त्यांना कसा ही भ्रमलेला शिष्य मिळाला तरी ही त्या शिष्याचे सर्व प्रकारच्या भ्रमांचे पक्के बंद कुलुप साहेबाच्या भारी ज्ञानाने सहज उघडून देतात. ।।७४।।

भक्त बिना मत अंग रे ।। चोसट ही सब झूट ।।
सुणज्यो सब सुखराम के ।। ज्यूं नर खाली मूट ।।७५।।

जर हे सर्व ही स्वभाव आणि लक्षण असले आणि त्याच्यात भक्ती नसेल म्हणजे सतशब्द नसेल त्याच्यात त्याचे हे आठ स्वभाव आणि चौसष्ठ लक्षण त्या साधुला अमर लोकात घेवून जाण्यास खोटे आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, असे आठ स्वभाव आणि ६४ लक्षण परीपूर्ण असणारे आणि सतशब्दाचे भक्तीहिन साधु हे खाली मुठी सारखे आहेत. म्हणजे जसे कोणाच्या मुठीमध्ये दुःखाच्या वेळी संसारात उपयोगात येणारी हिऱ्या सारखी अनमोल वस्तु आहे.ती बंद आहे.याला भरलेली मुठ म्हणतात.तसेच कोणाची बंद मुठ आहे.परंतु उघडल्यावर दिसले की,त्या मुठीत संसाराच्या दुःखात कामात येणाऱ्या हिऱ्या सारखी कोणती ही अनमोल वस्तु नाही आहे.कवडी सारखी ज्याची काही किंमत नाही अशा वस्तुने भरलेली आहे. ।।७५।।

निरस चीज सब लेत हे ।। सरसी बिरळा कोय ।।
युं निरगुण सुखराम के ।। सुरगुण भक्ति होय ।।७६।।

या जगात निरस म्हणजे हलक्या वस्तु तर सर्व कोणी घेतात.परंतु भारी जिन्नस (वस्तु)घेणारे फारच थोडे जन आहे.(एखादाच आहे)असेच भक्ती मध्ये निरस आणि भारी प्रकार आहे.सदा करीता आवागमनात,८४ लक्ष योनीचे दुःख मिटवते आणि महासुखात घेवून जाते आणि सगुण भक्ती ही हलकी भक्ती आहे.ही भक्ती वैकुंठाच्या सुखा पर्यंत पोहचविते.परंतु महाकाळाच्या मुखात ठेवते आणि जन्म–मरणाच्या चक्रात टाकते. ।।७६।।

च्यार ब्रण नर नार में ।। फेर फार नही कोय ।।
हरजी तो सुखराम के ।। प्रेम प्रित बस होय ।।७७।।

चार वर्ण ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य व शुद्र यातील कोणत्याही स्त्री पुरुषाला हरजीशी प्रेम प्रीती असेल त्याच्या वश हरजी होवून जातात.याप्रकारे हरजी प्राप्त करण्यात उंच व निच वर्णाच्या स्त्री किंवा पुरुषात काही ही फेर फार नाही.।।७७।।

संस्कृत काव्य कहूँ ।। तो जुग समझे नांय ।।

ता कारण सुखराम के ।। बोलूं प्राकृत मांय ।।७८।।

हरजी सहज कसे वश होवून जातात?हे काव्य म्हणजे अणभे वाणी मी वेद शास्त्रा प्रमाणे संस्कृत मध्ये ही सांगु शकलो असतो.परंतु जगातील सर्व लोक संस्कृत समजत नाही. म्हणून मी प्राकृत मध्ये म्हणजे सर्वांना समजेल अशा भाषेत बोलत आहे.।।७८।।

भूला नर भँवता फिरे ।। हर ढुँढण कूं जाय ।।
साहिब तो सुखराम के ।। नेड़ा हे तन माय ।।७९।।

हे सर्व भुललेले मनुष्य आहेत.ते हरला शोधण्याकरीता तिर्थ,मंदिर इ.जागी भटकतात. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तो साहेब तर आपल्या बिलकुल जवळ म्हणजे हंसाच्या तनातच आहे. ।।७९।।

बाहीर नर ढुँढत फिरे ।। साहेब के ताँई ।।
हर तन मे सुखराम के ।। से सुझे नाही ।।८०।।

कित्येक मनुष्य साहेबाला तनाच्या बाहेर शोधतात. परंतु तो साहेब आपल्या हंसाच्या शरीरातच आहे.तरी ही त्यांना तो साहेब सुचत नाही. ।।८०।।

सुखराम दास मन जोस हे ।। तब लग क्रणी होय ।।
निर्बळ होय गरिबी गही ।। ज्यांसूं बणे न कोय ।।८१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील स्त्री–पुरुषांना सांगतात की,मायावी मनात जोर आहे तोपर्यंत मनुष्य ८ अंग आणि ६४ लक्षण पाळून वेद शास्त्रात सांगितलेल्या करण्या करतात.जेंव्हा निर्बल होवून जातो.म्हणजे मन जोशहीन होवून जाते आणि मन गरीबी धारण करते.तेंव्हा त्याच्याने वेदात सांगीतलेली छोटीसी ही करणी होत नाही. ।।८१।।

हर की गत सुखराम के ।। मो से लखी न जाय ।।
समझ्या सुरड़े पानड़ा ।। भोळा निजफळ खाय ।।८२।।

त्या हरची गती माझ्या समज मध्ये काही येत नाही.जो मनुष्य वेदाच्या करणीत खुप समजलेले आहे,हुशार आहे ते साधुचे आठ स्वभाव आणि त्याचे ६४ लक्षण वेग वेगळे पाहतात आणि तेच असली साधु आहे समजून त्यांनी सांगितलेल्या वेदाच्या करण्यां मध्ये साहेब शोधतात आणि जे भले आहेत ते साधुचे आठ स्वभाव ६४ लक्षण पाहण्यात लागत नाही.ते सरळ त्यांच्यात जो सतशब्द आहे त्याला धारण करुन घेतात.जसे समजवान मनुष्य झाडाच्या पानात लागून जातात आणि झाडाचे गोड फळ त्यागुन देतात आणि भोळा मनुष्य झाडाच्या पानांमध्ये न लागता झाडाचे निजफळ खातो. ।।८२।।

।। इति साध लछ को अंग संपूरण ।।